

# भूगोल-अर्थशास्त्र, लेख-१५

**सदाशिव पाटील, शाळा :** बालमोहन विद्यामंदिर, दादर

**बोर्ड परीक्षा नमूना उत्तरपत्रिका (क्रमशः)**

**प्र. ४ : सविस्तर उत्तरे (कोणतेही दोन)**

१) वनस्पती व प्राणी अवक्षय :

- विपुल जैविक विविधता असलेल्या १२ देशांमध्ये भारताचा समावेश असून जगातील एकूण सजीवांच्या ५ टक्के जैवविविधता भारतात आढळते.
- भारताच्या वैशिष्ट्यपूर्ण स्थानामुळे येथील सजीवांचे गुणधर्म आफ्रिका, युरोप, चीन आणि मलेशिया इत्यादी प्रदेशांतील संजीवांशी जुळतात.
- भारतात अन्नधान्य, मसाल्याचे पदार्थ, भाज्या, कडधान्ये, तंतू पिके, पेय पिके यांचे विविध प्रकार आढळतात.
- भारतातील वनस्पती आणि प्राणी प्रजातींची संख्या झपाट्याने कमी होऊन गेल्या काही दशकांत वनस्पतीत घट झाली आहे.
- ज्ञात असलेल्या औषधी वनस्पतींपैकी काही वनस्पती तसेच काही दुर्मीळ प्राण्यांच्या प्रजाती नामशेष होत आहेत.
- वाढणारी लोकसंख्या, विविध उद्योग यांमुळे वनस्पती व प्राणी प्रजातींचा अवक्षय होत आहे. रस्ते, रेल्वे, घरबांधणी, शेती, औद्योगिक प्रकल्प, जलविद्युत प्रकल्प इत्यादींच्या उभारणीमुळे वनस्पती, प्राणी त्याचप्रमाणे संपूर्ण परिसंस्थाच नष्ट होत आहेत.

**२) तांबे खनिजाची उपयोगिता व उत्पादक क्षेत्र-**

- तांबे हा धातू न गंजणारा व उत्तम विद्युतवाहक आहे.
- मिश्र धातू बनविण्यासाठी, विद्युतवाहक तारा, विद्युत उपकरणे आणि भांडी तयार करण्यासाठी हा धातू उपयोगी पडतो.
- तांबे या खनिजाचा उपयोग औषधनिर्मितीमध्येही होतो.
- या खनिजाचे अधिक उत्पादन झारखंड राज्यात पश्चिम सिंगभूम व हजारीबाग या जिल्ह्यात होते.
- राजस्थानमधील झुनझुनू, मध्य प्रदेशातील बालाघाट जिल्ह्यात तांबे मोठ्या प्रमाणात आढळते.
- कर्नाटक, आंध्र प्रदेश, उत्तर प्रदेश, सिक्कीम, मेघालय या राज्यांत काही प्रमाणात साठे आहेत.

*(टीप : स्टेन्सिलच्या सहाय्याने भारताचा नकाशाच्या आराखडा काढून त्यावर एखादे तांबे उत्पादक क्षेत्र दाखवावे)*

**३) भारतातील सुती कापड उद्योग**

- कापूस, ताग, लोकर, रेशीम अशा तंतुमय पदार्थांपासून कापड विणले जाते. सुती कापड उद्योगात कापूस हा प्रमुख कच्चा माल आहे.
- कापूस वजनाने हलका, वजन न घटणारा असा कच्चा माल असून त्याची दूरवरची वाहतूकही परवडणारी असते. त्यामुळे या उद्योगाचे स्थान मोठ्या शहरांच्या जवळ असते.
- कापड विणणे, रंगविणे, छपाई आशा प्रक्रिया शहराजवळील कापड गिरण्यांमध्ये केल्या जातात.
- या उद्योगास भरपूर भांडवल आणि श्रमिकांची आवश्यकता असते.
- महाराष्ट्र, गुजरात, तामिळनाडू ही राज्ये या उद्योगात आघाडीवर असून पश्चिम बंगाल, उत्तर प्रदेश, पंजाब, राजस्थान, कर्नाटक, आंध्र प्रदेश, केरळ या राज्यांत सुती कापड गिरण्या आहेत.
- अहमदाबाद, मुंबई, सोलापूर, नागपूर, इंदौर, उज्जैन इत्यादी शहरांतून हा उद्योग केंद्रित झाला आहे. अशा शहरांमध्ये कापूस उत्पादकक्षेत्राची समीपता, कुशल कामगार, भांडवल, बाजारपेठ, वाहतूक सुविधा यासारखे घटक अनुकूल आहेत.

*(टीप : स्टेन्सिलद्वाने भारताच्या नकाशाचा आराखडा काढून त्यावर महत्वाची दोन सुती कापड उद्योग केंद्रे दाखवावीत)*

## अर्थशास्त्र

**प्र. ५ : योग्य पर्याय भरून पूर्ण केलेली विधाने.**

१) प्रतिष्ठाप्राप्त उद्योगसंस्थांचे स्वतःचे **गुणवत्ता** नियंत्रण विभाग आहेत.

२) आर्थिक वृद्धीची प्रक्रिया ही **गतिमान** अर्थव्यवस्थेत उद्भवते.

**प्र. ६ : एक ते दोन वाक्यांत उत्तरे (कोणतेहा तीन)**

१) वस्तूची किंवा सेवेची खरेदीसाठी निवड करताना तिची गुणवत्ता, वजन, प्रमाणीकरण, शुद्धता आणि किंमत इत्यादींबाबतआवश्यक माहिती मिळविण्याचा ग्राहकाला असणारा अधिकार म्हणजेच माहितीचा अधिकार होय.

२) नियोजन आयोगाने नमूद केल्याप्रमाणे अल्पविकास म्हणजे 'एखाद्या देशात कमी-अधिक प्रमाणात बेरोजगार अथवा अपूर्ण रोजगाराची श्रमशक्ती एका बाजूस तर दुसऱ्या बाजूस वापरात न आणली गेलेली नैसर्गिक साधनसंपत्ती' यांचे सहअस्तित्व असणे होय. भारतासह जगातील अनेक देश 'अल्पविकसित' या प्रकारात सामावले जातात.

३) शेतमालाची निर्यात मोठ्या प्रमाणात होईल, अशी भारताला अपेक्षा होती; कारण जकातीचे दर कमी झाल्यास शेतमालाच्या आंतरराष्ट्रीय आणि देशांतर्गत किमती घटतील तसेच विकसित देशांच्या तुलनेत कमी श्रमखर्चाचा लाभ भारताला मिळेल.

४) तुटीचे अर्थप्रबंधन म्हणजे 'सरकारी खर्चाच्या अशा वित्तीय योजना की ज्याद्वारे तूट भरून काढण्यासाठी रिझर्व्ह बँकेजवळील रोख शिल्लक उपयोगात आणली जाते किंवा रिझर्व्ह बँकेकडून कर्ज घेतले जाते.'

५) उदारीकरणाचा मुख्य उद्देश हा आहे की, परवाना धोरण रद्द करून उद्योजकांना कोणतेही उद्योग कोठेही सुरू करण्याचे किंवा बंद करण्याचे पूर्ण स्वातंत्र्य देणे होय.

**प्र. ७ : पाच ते सहा वाक्यांत उत्तर (कोणतेही एक)**

**१) उद्दिष्टाधारित सार्वजनिक वितरणप्रणाली :**

- दुहेरी किंमत रचना असणारी ही वितरणप्रणाली १९९७ मध्ये सुरू करण्यात आली.
- या वितरणप्रणालीनुसार दारिद्र्य रेषेखालील कुटुंबांसाठी बाजारातील किमतीच्या ५० टक्के किमती ठरविण्यात आल्या; दारिद्र्यरेषेच्या वरील कुटुंबांसाठी वितरणप्रणालीच्या किमती बाजार किमतीच्या जवळपास ठरविण्यात आल्या.
- दारिद्र्यरेषेच्या वरील कुटुंबांकडून होणाऱ्या खरेदीचे प्रमाण कमी झाले; कारण सार्वजनिक वितरण प्रणालीमधून धान्य खरेदी करण्याचे त्यांना कोणतेही प्रलोभन नव्हते.
- खरेदीचे प्रमाण कमी झाल्याने सरकारकडील अन्नधान्याच्या साठ्यात वाढ झाली.
- सरकारने जुलै २००१ पासून दारिद्र्यरेषेवरील कुटुंबांसाठी सार्वजनिक वितरणप्रणालीच्या किमती ३० टक्क्यांनी कमी केल्या व समस्या सोडविण्याचा प्रयत्न केला.

**२) भाववाढीचे वितरणावरील चार परिणाम :**

- **धनको आणि ऋणको** : कर्ज घेणारा कर्ज देणाऱ्याला प्रत्यक्षात कर्जाऊ घेतलेल्या रकमेपेक्षा कमी खरेदीशक्ती परत करतो त्यामुळे भाववाढीच्या काळात धनकोचे नुकसान होते तर ऋणकोला फायदा होतो.
- **वेतन व मजुरी मिळणारा वर्ग :** अशा वर्गाचे भाववाढीच्या काळात नुकसान होते. कारण ज्या प्रमाणात जीवनमानावरील खर्चात वाढ होते, त्या प्रमाणात त्यांच्या वेतन आणि पगारात वाढ होत नाही.
- **स्थिर उत्पन्न गट** : भूतकालीन बचतीवर जीवन जगणाऱ्या, सेवानिवृत्ती वेतन घेणाऱ्या,व्याज आणि भाडे मिळविणाऱ्या व्यक्ती यांचे भाववाढीच्या काळात नुकसान होते; कारण त्यांचे पैशातील उत्पन्न स्थिर असते; परंतु वस्तूंच्या किमतीत जास्त दराने वाढ होते.
- **संघटक, उत्पादक, विक्रेते, दुकानदार** किंवा व्यावसायिक यांना भाववाढीच्या काळात फायदा होतो. तसेच विक्रीयोग्य वस्तूंचे आधिक्य जास्त असणाऱ्या मोठ्या शेतकऱ्यांना या काळात फायदा होतो.

**उद्याचा विषय : मराठी (बोर्ड परीक्षा नमुना प्रश्नपत्रिका)**

**संपर्क :** yashasvibhava2007@gmail.com